## निशाणी क्र. ६१ खाली आदेश

(दिनांक १२ माहे ऑगस्ट २०२६ रोजी पारीत)

०१. वादी क्र. १ ने सदरच्या अर्जाद्वारे वादी क्र. २ चे मृत्यूमुळे प्रस्तुत दावा बंद होण्याच्या मान्यता आदेशाला रद्दबातल ठरवावे, अशी मागणी केलेली आहे.

०२. सदर वादीनुसार, वादी क्र. २ नामे अशोक जगन्नाथ काळे हे दिनांक ११/०५/२०२५ रोजी मौजे कोलवडी, ता. हवेली, जि. पुणे येथे दिर्घ आजाराने मयत झालेले आहेत. त्यांना त्यांचे पश्चात पत्नी व दोन मुले असून सदर वादी हा मयत वादीचा सख्खा भाऊ आहे. मयत वादी क्र. २ यांचे मृत्यूनंतर सदर वादी व मयताचे वारस हे दु:खात असल्याने व त्यांची मानसिक स्थिती चांगली नसल्याने मयत वादीचे वारस विहीत मुद्दतीत अभिलेखावर घेता आलेले नाहीत. प्रस्तुत प्रकरण हे स्थावर मिळकतीचे असून त्यातील विवाद्य मिळकतीसबंधी मयत वादीचे हितसबंध गुंतलेले असल्याने त्याचे वारस अभिलेखावर येणे अत्यंत आवश्यक व गरजेचे आहे, अन्यथा सदर वादीचे कधीही पैशात न भरून येणारे नुकसान होईल. तेव्हा मयताच्या मृत्युमुळे दावा बंद होण्याच्या मान्यता आदेशाला रद्दबातल ठरवावे, अशी त्याने विनंती केलेली आहे.

०३. प्रतिवादींनी सदर अर्जाला विरोध करताना प्रस्तुत अर्ज मुद्दतीत नाही, त्यामुळे मयत वादी क्र. २ विरुद्ध दावा बंदचा आदेश झालेला आहे. तेव्हा अर्ज नामंजूर करण्यात यावा, अन्यथा मंजूर केल्यास सदर वादीवर परीव्यय लादण्यात यावा, अशी त्यांनी विनंती केलेली आहे.

०४. सदर वादीच्या वतीने वकील श्री. जी. पी. लावंड यांना तर प्रतिवादींच्या वतीने वकील श्री. व्ही. डी. पवार यांना ऐकले.

०५. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश २२ नियम १ अन्वये वादी किंवा प्रतिवादी यांच्या मृत्यूमुळे, जर का त्यांचा किंवा त्यांच्याविरुद्ध दावा पुढे चालविण्यायोग्य त्यांना वारस असतील तर तो बंद होत नाही तर नियम ३ अन्वये वादीच्या वारसांच्या अर्जावरुन त्यांना मयताऐवजी अभिलेखावर बदलले जावू शकते. जेव्हा त्या सबंधाने विलंब झाला तर तो न्यायालयाचे समाधान झाल्यावरून की, त्यासाठी पर्याप्त कारण दिलेले आहे, तो विलंब माफ केला जावू शकतो आणि त्यासाठी मयताचा दावा बंद होण्याच्या मान्यता आदेशालाही रद्दबातल ठरविले जावू शकते.

०६. हे स्पष्ट आहे की, सदर वादीने प्रस्तुतचा अर्ज करण्यास सुमारे ११ महिने १६ दिवसांचा उशिर केलेला आहे; परंतु सदर न्यायालयाने निशाणी क्र. ५९ वरील अर्ज मंजूर करताना या कारणासाठी झालेला विलंब माफ केलेला आहे, तेव्हा मयत वादीच्या वारसांना अभिलेखावर बदलण्यासाठीचा अर्ज विचारात घेण्यासाठी सदर मान्यता आदेश रद्दबातल करणे गरजेचे आहे. तेव्हा पुढीलप्रमाणे आदेश:

**आदेश**

१. अर्ज विनंतीप्रमाणे निशाणी क्र. ५९ वरील आदेशाच्या पुर्ततेतहत मंजूर करण्यात येत आहे;

२. परीव्यय हा अर्जदार/सदर वादीवर राहील.

Digitally signed by BHAGWAN DHONDIRAM PANDIT
Date: 2026.08.12 17:46:07 +0530

दिनांकः १२.०८.२०२६

**(भगवान धों. पंडित)**
दिवाणी न्यायाधीश वरिष्ठ स्तर,
भूम, जि. उस्मानाबाद.

**C E R T I F I C A T E**

I affirm that the contents of this P D F file order/ judgment are same word to word as per the original order/judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | N. V. Koli<br>Stenographer Grade-II |
| Name of Court | : | Civil Judge Senior Division<br>Bhoom, Tq. Bhoom,<br>Dist. Osmanabad. |
| Order/ Judgment date | : | 12.08.2026 |
| Order/ Judgment signed by the Presiding Officer on | : | 12.08.2026 |
| Order/ Judgment uploaded on | : | 12.08.2026 |